**मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची 12 वी मासिक बैठक दि.30.01.2018**

**स्थळ :- मा. विभागीय आयुक्त यांचे कार्यालय कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.**

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.30.01.2018 रोजी कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. जगदिश पाटील | विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई. | विभागीय आयुक्त |
| 2 | श्री. एन. वासुदेवन | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक |
| 3 | श्री. जयरामेगौडा आर. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | उप वनसंरक्षक |
| 4 | श्री . मंगेश जोशी | अप्पर जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग. | अप्पर जिल्हाधिकारी |
| 5 | श्री. भरत शितोळे | अप्पर जिल्हाधिकारी, रायगड | अप्पर जिल्हाधिकारी |
| 6 | श्री. एस.एस. चव्हाण | | |
| 7 | श्री. मिलिंद पंडितराव | विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक | विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक |
| 8 | श्री. शिवाजी कादबाने | प्र. उप आयुक्त | |
| 9 | श्री. विश्वास दि. गुजर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर. | अपर चिटणीस |
| 10 | श्री.दादासाहेब चाबुकस्वार | उप आयुक्त नवी मुंबई, महानगरपालिका | उप आयुक्त नवी मुंबई |
| 11 | श्री. प्रमोद व्ही. पाटील | सिडको | नोडल अधिकारी |
| 12 | श्री. किरण सुरवसे | तहसिलदार वसई, जि. पालघर | तहसिलदार वसई. |
| 13 | श्री. ज.व. वळवी | भि.नि.श.महानगरपालिका | कक्ष अधिकारी |
| 14 | श्री. पी.डी. चव्हाण | जिल्हाधिकारी का. मुंबई | सहा. पोलीस निरीक्षक |
| 15 | श्री. विजय रिकामे | विभागीय आयुक्त कार्यालय. | ना. तह. (महसूल) |
| 16 | श्री. दिपक दि. पुजारी | उपायुक्त मीरा-भाईंदर, मनपा | मीरा-भाईंदर, महानगरपालिका |
| 17 | श्री. अजय पो. कांबळे | पोलीस निरीक्षक ठाणे शहर | पोलीस निरीक्षक ठाणे शहर |
| 18 | श्री. संजय रा. नाईक | रत्नागिरी जिल्हा पो. अधिक्षक | सहा.पो. निरीक्षक |
| 19 | श्री. दत्तात्रय ज्ञा. गावडे | ठाणे ग्रामीण पो. अधिक्षक | ठाणे ग्रामीण पो. अधिक्षक |
| 20 | श्री. सुरेश सु. फडके | ठाणे ग्रामीण पो.अधिक्षक कार्यालय | सहा. पो. निरिक्षक |
| 21 | श्री. निरंजन र. खानोलकर | मुंबई महानगरपालिका | उप जल अभि. |
| 22 | श्री. स्टॅलिन डी. | वनशक्ती | संचालक |
| 23 | श्रीमती. मनिषा प्रधान | ठाणे महानगरपालिका | प्रदुषण नियंत्रण अधिकारी |
| 24 | श्री. नामदेव विठ्ठल बंडगर | पो. निरीक्षक | पो. निरीक्षक |
| 25 | डॉ. संतोष भिटे | उप विभागीय अधिकारी, भिवंडी | उप विभागीय अधिकारी |
| 26 | श्री. तानाजी सुरुरकर | सहा. पो. आयुक्त, मुंबई | सहा. पो. आयुक्त, मुंबई |
| 27 | श्री. संदिप शिवले | सहा. पोलीस निरीक्षक, पालघर | पो. निरीक्षक, पालघर |

दि.30/01/2018 च्या बैठकीमध्ये सदस्य सचिव यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व सभेला सुरुवात केली.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>मुद्दा</th><th>करावयाची कार्यवाही</th><th>अंमलबजावणी करणारी यंत्रणा</th></tr>
<tr><td>१</td><td>कोकण वेटलॅंड तक्रार निवारण नवीन वेबसाईडला सुरुवात करणे.</td><td>कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची Website आयोजित करण्यात आली असून या संदर्भात Press Note ही देण्यात आली होती असे सदस्य सचिवांनी सांगितले. या संदर्भात Press Note देण्यात आली असून श्री. मुले, उपसंचालक यांच्या मदतीच्या सहाय्याने प्रसिध्दी करण्याचे आदेश देण्याच्या सुचना दिल्या होत्या त्यानुसार श्री.मुले यांना या संदर्भात पत्राद्वारे कळविण्यात आले असल्याचे सदस्य सचिवांनी सांगितले व इतर माध्यमातून प्रसिध्दी करण्याचे काम चालू करण्यात आलेले आहे असे समितीला सांगितले.</td><td>सदस्य सचिव</td></tr>
<tr><td>२</td><td>टोल फ्री क्र. 1926 या सेवेचा लाभ घेणे.</td><td>अ) Ex. Director, Mangrove and Marine Biodiversity conservation foundation यांनी सदर वर्षात 1926 Hello Forest सेवा चालू करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. पुढील वर्षासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून ते Additional Chief Secretary (Environment) देण्यात आले आहे असे सदस्य सचिवांनी सांगितले.<br>ब) समितीने Nodal officer ची नेमणूक करण्यासंदर्भात सांगितले त्यानुसार प्रत्येक जिल्हयामधून 2 Nodal Officer (एक महसूल व एक वन विभाग) ची माहिती देण्यास जिल्हा प्रशासनाला सांगितले तसेच त्यासाठी समितीला आवश्यक असणारी माहिती पुढील स्वरुपात प्राप्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<table><tr><th>नोडल अधिकाऱ्याचे नाव</th><th>पद</th><th>दुरध्वनी क्रमांक</th><th>ई.मेल ID</th></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr></table>या संदर्भात जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग,जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, उपवनसंरक्षक अलिबाग, आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका, पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग,उपवनसंरक्षक रोहा आणि उपवनसरंक्षक ठाणे यांच्या कडून Nodal अधिकाऱ्यांची माहिती प्राप्त झाली असून इतर जिल्हयांना Nodal अधिकाऱ्यांची निवड करुन या बाबत तात्काळ माहिती सादर करण्यास समितीने सांगितले.</td><td>सदस्य सचिव आणि सर्व जिल्हाधिकारी</td></tr>
<tr><td>३</td><td>जुन्या तक्रारींचा आढावा<br>१) श्री. विनोद पुन्शी व इतर<br>२) श्रीमती श्रुती अगरवाल<br>३) श्रीमती मनी अय्यर</td><td>समितीने सिडको यांना अहवाल सादर करण्यास सागितले.</td><td>सिडको</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | ४) श्रीमती रश्मी चौधरी<br>५) श्रीमती कांचन पुरोहीत<br>(Complaint Regarding Destruction of Wetland behind NRI complex in sector 60 Nerul, New Mumbai) | | |
| ४ | श्री. स्टॅलिन डी<br>Complaint Regarding Destruction of Wetland, Goregaon (East) Mumbai. | या तक्रारी संदर्भात प्राप्त झालेल्या जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या अहवालानुसार ही जागा पाणथळ नसून कृत्रिमरित्या केलेल्या खड्डयात साचलेले पाणी आहे. सदर जागेवर कोठेही कांदळवन नाही असे बैठकीमध्ये सांगितले. परंतु श्री. स्टॅलिन डी यांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या अहवालावर आक्षेप व्यक्त केला की, सदर क्षेत्र हे नैसर्गिकरित्या तयार झालेले पाणथळ आहे. त्यावर समितीने श्री. स्टॅलिन यांना त्या जागेचे Geo-Co-ordinates (GPS Reading) या संबंधी माहिती घेण्यास सांगून सदर क्षेत्र हे NWIA वेटलॅन्डमध्ये येते किंवा येत नाही, येत असल्यास आवश्यक ती कार्यवाही तहसिलदार बोरीवली यांना करण्यास सांगण्यात येईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर , तहसिलदार बोरीवली. |
| ५ | श्री. रोहित जोशी :-<br>(स्वामी समर्थ मार्ग,कोपरी ठाणे,पुर्व) | या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिका यांनी त्यांच्या दि.29/01/2018 च्या अहवालानुसार डेब्रीज हटविण्याची कार्यवाही पुर्ण झाल्याचे सांगितले. परंतु पन्हा 2.5 हेक्टर जागेवर डेबीज टाकण्यात आल्याचे महानगरपालिकेच्या प्रतिनीधींनी सांगितले. त्यानुसार समितीने पाण्याच्या भरतीच्या प्रवाहाच्या (Tidal Flow) दिशेने व्यवस्थितरित्या डेब्रिज हटविण्यासाठी 2 आठवडयात सदर जागेवरील काम पूर्ण करण्याच्या ठाणे महानगरपालिका यांना सूचना दिल्या व तेथील जागेवर ठाणे वन विभागाच्या मदतीने कांदळवनाची लागवड लवकरात लवकर करण्याचे आदेश दिले आहेत. | ठाणे महानगरपालिका |
| ६ | श्री. फ्रान्सिस डिसोजा:-<br>(मौजे भुईगांव सर्वे क्र. 220) | श्री. फ्रान्सिस डिसोझा यांच्या तक्रारी संदर्भात तहसिलदार,वसई यांनी मागील दि.21/12/2018 च्या बैठकीमध्ये अहवालानुसार दिवाणी न्यायालयास स्थगिती उठविण्यासाठी दि.12/06/2017 रोजी विनंती केलेली आहे व त्याची पुढील सुनावणी दि. 12/01/2018 अशी होती या सदंर्भात कोणतीही माहिती प्राप्त नसल्याने आणि या बैठकीत जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडून कोणीही प्रतिनिधी उपस्थित नसल्याने समितीच्या अध्यक्षांनी सदस्य सचिवांना तहसिलदार वसई यांना पत्र पाठवण्यास सांगितले की, पुढील बैठकीपूर्वी या तक्रारी संदर्भात केलेल्या | जिल्हाधिकारी, पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कार्यवाहीचा अहवाल आणि संपुर्ण माहितीसह उपस्थित राहण्याचे आदेश समितीने दिले आहेत. | |
| ७ | श्री. अनंत दत्तात्रय पाटील :- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220) | श्री. अनंत दत्तात्रय पाटील यांच्या तक्रारी संदर्भात तहसिलदार,वसई यांनी मागील दि.21/12/2018 च्या बैठकीमध्ये अहवालानुसार दिवाणी न्यायालयास स्थगिती उठविण्यासाठी दि.12/06/2017 रोजी विनंती केलेली आहे व त्याची पुढील सुनावणी दि.12/01/2018 अशी होती या सदंर्भात कोणतीही माहिती प्राप्त नसल्याने आणि या बैठकीत जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडून कोणीही प्रतिनिधी उपस्थित नसल्याने समितीच्या अध्यक्षांनी सदस्य सचिवांना तहसिलदार वसई यांना पत्र पाठवण्यास सांगितले की, पुढील बैठकीपूर्वी या तक्रारी संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आणि संपुर्ण माहितीसह उपस्थित राहण्याचे आदेश समितीने दिले आहेत. | जिल्हाधिकारी, पालघर |
| ८ | New Link Road Residence Forum, Dahisar West :- | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी त्यांच्या दि.30/02/2017 च्या पत्राद्वारे उपलब्ध मुख्य वनसरंक्षक कांदळवन यांच्या अहवालानुसार सदर जागेवर माती भराव केला असून कांदळवनाची तोड झालेली असून समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी पॅन इंडिया पर्यटन प्रा. लि यांच्यावर ई.पी.ए. 1986 अंतर्गत गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या व तेथील जागेत कांदळवनाची झाडे लावून या जागेचे restore करण्याचे आदेश दिले. सदर जागेचे restore करण्यासाठी येणारा खर्च पॅन इंडिया पर्यटन प्रा. लि. यांच्याकडून वसूल करण्याचे आदेश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| ९ | धीरज परब:- ईमेलद्वारा प्राप्त अर्ज | श्री. धिरज परब यांच्या तक्रारी संदर्भात समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना एक महिन्याची मुदत अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार काही प्रमाणात अतिक्रमण हटविण्यात आल्याचा अहवाल देखील त्यांनी सादर केलेला आहे. उर्वरित अतिक्रमण हटविण्याचा अहवाल अद्याप प्रलिंबीत असून श्री. धिरज परब यांनी दिलेल्या तक्रारींचे ठिकाण आणि कार्यवाही केलेल्या जागेचे ठिकाण यात फरक असल्याचे समितीने सांगितले त्यामुळे योग्य जागेचे ठिकाण जाणून घेऊन तेथील अतिक्रमण व डेब्रीज हटविण्याचे आदेश समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना दिले व त्याचा लेखी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | आयुक्त,मिरा-भाईंदर महानगरपालिका. |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्री. नंदकुमार पवार:- (बाळकुम, कशेरी, काल्हेर, अंजूर दिवा) | या तक्रारी संदर्भात अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सद्यस्थितीची पहाणी करुन FIR दाखल केली असल्याचे निवासी जिल्हा अधिकारी, ठाणे यांनी मागील बैठकीत सांगितले होते. या तक्रारी संदर्भात मागील बैठकीमध्ये समितीने निवासी उप जिल्हाधिकारी, ठाणे यांना त्यांचा अपेक्षित अहवाल मागीतला होता, परंतु अद्याप त्यांच्या कडून कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही त्यानुसार समितीने त्यांना एका आठवडयात त्यांचा अंतिम अहवाल प्राधान्याने सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>सदर क्षेत्रावर झाडे लाऊन सदर जागा Restore करण्या संदर्भात चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी ठाणे यांच्या प्रतिनीधीने समितीला सदर क्षेत्र हे काही दिवसा अगोदरच वन विभागाकडे ताब्यात देण्यात आलेली आहे असे सांगितले. सदर क्षेत्र सरकारी जमीन असल्याने अध्यक्षांनी वन विभागाला तेथे झाडे लाऊन तेथील जागा Restore करण्यास सांगितले. सदस्य सचिव यांनी सदर क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात देण्या अगोदरच तेथे डेब्रीज टाकण्यात आल्याचे सध्य:स्थितीत डेब्रीज हटविण्याचे काम कोण करेल असे समितीला विचारले. अध्यक्षांनी सदर क्षेत्र हे ज्या कोणाच्या ताब्यात असेल तो तेथील डेब्रीज हटवून त्या जागेवर झाडे लाऊन सदर जागा Restore करण्याचे काम करेल. त्यानुसार त्यांनी ठाण्यातील वन विभागाला सदर जागेत झाडे लावून जागा Restore करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे, निवासी जिल्हाधिकारी, ठाणे,उपवनसंरक्षक ठाणे |
| ११ | श्री. ॲल्विन विन्सॅट रॉड्रीग्ज :- (मौजे बोळींज , स.न. 390 ता. वसई जि. पालघर) | सदस्य सचिवांनी समितीला सांगितले की, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार river streams हे वेटलॅन्ड यांदीतून वगळण्यात आले आहे. तसेच वेटलँन्ड नियम 2010 नुसार Paddy fields हे वेटलॅन्ड व्याख्येत या क्षेत्राचा समावेश नाही. समितीने सदरचे क्षेत्र NWIA या यादितील वेटलॅन्ड मध्ये येते किंवा नाही ? यांची पाहणी करणेबाबत आदेश दिले होते.<br>समितीने सदस्य सचिवांना विचारणा केली की, सदर जमीनीचे क्षेत्रीय कर्मचाऱ्याकडून GPS co-ordinates रिडींग प्राप्त झाल्यावर सदरचे क्षेत्र NWIA या यादितील वेटलॅन्ड मध्ये येते किंवा नाही हे तपासण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी , पालघर आणि सदस्य सचिव |
| १२ | इतर विषय | समितीच्या अध्यक्षांनी दि.21.12.2017 च्या बैठकीमध्ये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असे सुचित केले की प्रत्येक जिल्हयातून त्या वन विभागाशी सल्लामसलत करुन कमीत कमी एक अशी योग्य त्या वेटलॅन्ड क्षेत्राची निवड | सर्व जिल्हाधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करावी जी जैवविविधतेने व पर्यावरणीयदृष्टया महत्वाची आहे.जेणेकरुन स्थानिक नागरीकांच्या सहाय्याने वेटलँन्ड क्षेत्र पर्यटन स्थळ (Eco-Tourism) म्हणून विकसीत करता येईल. परंतु यावर कोणत्याही जिल्हयातून योग्य वेटलॅन्ड निवडण्यात आली नसल्याकारणाने समितीने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दोन आठवडयात योग्य वेटलॅन्ड निवडण्याचे आदेश दिले आहेत. | |
| १३ | Website / Email द्वारा प्राप्त नवीन तक्रारींचा आढावा.<br>१) श्री. ब्रिजेश शर्मा - KW1 मौजे नवघर, सर्वे नं. 265/2,4 व 266/1 आणि 267/2 मुंबई उच्च न्यायालय यांचे आदेश (स्थळ:- मिरा-भाईंदर जि. ठाणे) | या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांनी या तक्रारी संदर्भात समितीला माहिती दिली आणि जिल्हाधिकारी ठाणे आणि आयुक्त मिरा-भाईंदर यांना आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे.<br>अ) समितीने उप आयुक्त मिरा-भाईंदर यांना विचारणा केली असता त्यांनी पहाणीकेल्यानुसार तेथे सदर जागा ही पाणथळ क्षेत्र नसून ते CRZ ने बाधित नसल्याचे सांगितले. समितीच्या अध्यक्षांनी सदर क्षेत्र हे NWIA मध्ये येते किंवा येत नाही, याची चौकशी करण्यास सांगितले. सदर क्षेत्र NWIA मध्ये येत असल्यास त्याचे Wetland (Conseration & Mangement) Rule, 2010 अंतर्गत संरक्षण केले जाईल. सदर क्षेत्र जर NWIA मध्ये नसल्यास कांदळवन असून (Not Mention in NWIA) ही तक्रार या समितीकडून जिल्हाधिकारी ठाणे यांना वर्ग करण्यात येईल असे सांगितले.<br>ब) तसेच सदस्य सचिवांनी या वर चर्चे दरम्यान फक्त एक Single Geo-Co-ordinates असल्यामुळे पाणथळाच्या exact boundary तपासणे हे फार अवघड (कांदळवनाच्या क्षेत्रावर) असल्याचे सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे आणि आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| | २) अज्ञात व्यक्ती - KW2 Lots of trucks dumpers dumping the red clay in Mangrove. (स्थळ:- सेक्टर-23 घनसोली, नवी मुंबई ) | सदस्य सचिवांनी ही तक्रार जिल्हाधिकारी ठाणे यांना पाठविली आहे असे सांगितले. या तक्रारी संदर्भात चर्चे दरम्यान उप आयुक्त नवी मुंबइ महानगरपालिका यांनी सदर क्षेत्र सिडको यांच्या क्षेत्रात येते असे सांगितले. अध्यक्षांनी सिडको यांना या संदर्भात विचारणा केली. त्यानुसार सिडको यांनी सदर जागा कांदळवन क्षेत्र नसून सदर जागेवर 50 मीटर Buffer Zone मध्ये कोणीतरी अज्ञात व्यक्तीने डेब्रीज टाकण्यात आले असल्याचे सांगितले. तसेच कांदळवन जागेच्या 5 मीटर अंतरावर रस्त्याच्या पलिकडे 30 मीटर अंतरावर हे डेब्रीज टाकण्यात आले असून ती जागा पाणथळ नसल्याचे सिडकोच्या प्रतिनिधीने सांगितले. अध्यक्षांनी सिडको | सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यांना सदर जागेवरील डेब्रीज हटविण्याचे आदेश दिले आहेत. समितीने सदर जागेची योग्य माहिती (Exact Location, GPS co-ordinate, Photographs etc.) नसल्याचे निदर्शनास आणले तसेच या संदर्भात कोणालाही केलेल्या कार्यवाहीचा विरोध असेल तर त्यांनी सदर क्षेत्रावर जाऊन स्वत: तपासणी करण्याबाबत सांगितले. या तपासणी दरम्यान काही आढळयास त्यांनी या संदर्भात आवश्यक ते दस्तऐवज समितीसमोर सादर करावे. | |
| | ३) श्री. नंदकुमार पवार :- Water reclamation at Bhandup,east opposite menon college. (स्थळ:- भांडूप (पूर्व), मुंबई) | समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना चौकशी करुन पुढील बैठकीमध्ये या संदर्भात अहवाल सादर करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| | ४) श्री. रेजी अब्राहम, अध्यक्ष, युनायटेड असोसिएशन. चारकोप कुंभारकला प्लॉटबाबत | या संदर्भात सदस्य सचिवांनी ही तक्रार मुंबइ कांदळवन समितीकडून पाणथळ समितीकडे वर्ग करण्यात आली असल्याचे सांगितले. समितीने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सदर क्षेत्र हे NWIA यादीतील वेटलॅन्ड क्षेत्र आहे किंवा नाही हे तपासून त्याचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर आणि विभागीय वन अधिकारी, कांदळवन संधारण घटक मुंबई, |
| | ५) श्री. नंदकुमार पवार:- Distruction and reclamation of mangroves and Wetlands at Dronagiri Node, Uran. | या तक्रारी संदर्भात समितीने सदस्य सचिवांना ही तक्रार जिल्हाधिकारी रायगड यांना पुढील कार्यवाही पाठविण्यात यावी असे सांगितले. | जिल्हाधिकारी, रायगड आणि सिडको |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

20/2/17

अध्यक्ष,

कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती

तथा

विभागीय आयुक्त कोकण विभाग.